# मेट्रोची पाच हजार कोटींची मजल

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ; कोरोना काळातही भुयारी मार्गाचे काम वेगाने

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ चे काम अत्यंत वेगाने सुरू असून, कोरोनासारख्या अत्यंत कठीण परिस्थितीमध्येदेखील मेट्रो-३ ने पाच हजार कोटी रुपयांची कामे पूर्ण केली आहेत.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून हा प्रकल्प राबविला जात आहे. देशातील हा पहिला भुयारी मेट्रो प्रकल्प असून, आजघडीला या प्रकल्पाने मोठा टप्पा गाठला आहे. कॉर्पोरेशनच्या दाव्यानुसार ७१ टक्के कामे पूर्ण झाली असून, मार्गाने भुयारीकरणाचे बरेच टप्पे पूर्ण केले आहेत. आजघडीला या प्रकल्पासाठी १६ हजार कामगार काम करत आहेत. भुयारीकरणाचे काम ९७ टक्के पूर्ण झाले आहे.

आम्ही नवीन वर्षाची सुरुवात अतिशय सकारात्मकतेने करत आहोत. गेल्या दोन वर्षांतील आमच्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना, हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, आम्ही एप्रिल २०२० आणि डिसेंबर २०२१ या कालावधीत पाच हजार कोटींहून अधिक किमतीची कामे केली आहेत.

- रणजीत सिंग देओल,
व्यवस्थापकीय संचालक,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

स्थानकांचे काम : ७७% पूर्ण

११ स्थानकांचे काम : ८५% टक्क्यांहून अधिक

१० स्थानकांचे काम : ७५%

५ स्थानकांचे काम : ५०%

### ४ लिफ्ट

एमआयडीसी आणि सिद्धिविनायक स्थानकावर ४ लिफ्ट वितरित केल्या आहेत आणि प्रत्येकी एक स्थापित करण्यात आली आहे.



### ७५% प्रगती

महालक्ष्मी, विज्ञान संग्रहालय, वरळी, दादर, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रूझ, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सहार रोड ७५% पेक्षा जास्त प्रगती दाखवत आहेत.

### ८५ टक्क्यांहून अधिक पूर्णत्व

कफ परेड, विधानभवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई सेंट्रल, सिद्धिविनायक, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ - टी २, मरोळ, एमआयडीसी आणि सीप्झ ही अकरा स्थानके ८५ टक्क्यांहून अधिक पूर्णत्व दर्शवत आहेत.

### ५०% प्रगती

गिरगाव, काळबादेवी, ग्रँट रोड, शीतलादेवी, आचार्य चौक या उर्वरित पाच स्थानकांनी जवळपास ५० % प्रगती केली आहे.

### प्रकल्प खर्चात वाढ

मेट्रो कारशेडचा तिढा अजून सुटलेला नसून, कोरोनाकाळातही किंचित का होईना येथील कामाला फटका बसला आहे. या साऱ्यातून झालेल्या विलंबाने प्रकल्प खर्चात दहा हजार कोटींची वाढ झाली आहे. हा खर्च २३ हजार कोटींहून ३३ हजार कोटी झाला आहे.

### दोन ट्रेन तयार

दोन ट्रेन तयार आहेत आणि उर्वरित प्रक्रिया सुरू आहे.

१५% पेक्षा जास्त ट्रॅक आधीच टाकले गेले आहेत, ज्याचे काम प्रगतिपथावर आहे.

### सरकते जिने

सरकते जिने बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यापैकी दोन सिद्धिविनायक आणि एक एमआयडीसी स्थानक येथे बसविण्यात आला आहे.

### २०२२ मध्ये काय होणार?

बोगदे पूर्ण करणे, यंत्रणा बसवणे, स्थानकांचे स्थापत्य पूर्ण करणे, ट्रॅकची कामे, विद्युतीकरण आणि हवाई वाहतूक यासारखी अनेक मोठी कामे होणार आहेत.



### कामगार त्यांच्या गावी परतले

कोरोनाच्या दोन साथीच्या लाटांचा प्रकल्पाच्या प्रगतीवर परिणाम झाला. पहिल्या लाटेत तसेच दुसऱ्या लाटेतही मर्यादित कामगारांसह काम केले गेले. कारण बहुतांश कामगार त्यांच्या गावी परतले.